## 16. भारताचा महालेखापरीक्षक
## भाग V कलम 148 ते 151

- **स्वीकृती -** इंग्लंड
- पहिले महालेखापरीक्षक - व्ही. नरहरी राव
- सध्या महालेखापरीक्षक - गिरीशचंद्र मुर्मू
- भारतीय संसदेचा एजंट लोकलेखा समितीचा मित्र, मार्गदर्शक, तत्त्वज्ञ तथा कान व डोळे असे म्हणतात.
- देशाच्या सार्वजनिक वित्ताचे पालक आर्थिक सल्लागार असतात.

**पदाचा इतिहास -**

- 1919 च्या सुधारणा कायद्यानुसार स्वतंत्र हिशोब तपासणीसाठी लेखापरीक्षक हे पद भारतात निर्माण करण्यात आले.
- 1935 च्या कायद्याने लेखापरीक्षक पदाची प्रतिष्ठा वाढवण्यात आली.
- नेमणूक / शपथ / राजीनामा - राष्ट्रपती
- कार्यकाळ - घटनेत निश्चित नाही तरी सर्वसाधारण 6 वर्षे. वयाच्या 65 वर्षापर्यंत पदावर असतात.
- पदमुक्ती - गैरवर्तन, अकार्यक्षमता या आधारावर. दोन्ही सभागृहाच्या विशेष बहुमताने पारीत ठरावानुसार राष्ट्रपती त्यांना पदावरुन दूर करतात.
- **कलम 148 -** कार्यकालाची हमी नाही. राष्ट्रपतीच्या मर्जीनुसार पद धारण करतात. वेतन सेवाशर्ती संसद कायाद्याद्वारे निर्धारित होतात.
- **कलम 149 -** कर्तव्ये आणि अधिकार. संसदेने पुढील कायद्याने (महालेखापरीक्षक कर्तव्ये, अधिकार व सेवाशर्ती कायदा 1971

मुळ कायद्यातील सुधारणा करुन 1976 मध्ये कॅगची लेखाविषयक कामे काढुन घेतली व लेखापरीक्षण करण्याची कामे ठेवली. 1976 च्या बदलानुसार - 1) लेखे तयार करण्याचे काम वित्त मंत्रालयाच्या नियंत्रणाखाली काम करणाऱ्या महालेखापाल यांच्याकडे देण्यात आले. 2) केंद्राच्या प्रत्येक मंत्रालयात वित्त सल्लागार हे पद निर्माण करुन त्याच्याकडे जमा खर्चाचे काम देण्यात आले. 3) लेखापरीक्षण करणे नियंत्रण व महालेखा परीक्षक यांच्याकडे सोपविण्यात आले.

- **कलम 150 -** केंद्र राज्य लेखे कोणत्या नमुन्यात ठेवावीत याबाबत राष्ट्रपतीला सल्ला देणे.
- **कलम 151(1) -** केंद्राचे लेखाविषयक अहवाल राष्ट्रपतीला सादर करतात, राष्ट्रपती ते दोन्ही सदनासमोर मांडण्याची व्यवस्था करतात.
- **कलम 151(2) -** सर्व राज्याचे लेखाविषयक अहवाल त्या राज्यपालाकडे सादर करतात. राज्यपाल ते राज्यविधिमंडळासमोर मांडण्याची व्यवस्था करतात.
- **कलम 279 -** कोणत्याही कराची व शुल्काचे निव्वळ उत्पादन प्रमाणित करुन देतात.